MHKO070009342023

<u>**रे.दि.मु.नं.११०/२०२३ मधील नि.४१ खालील आदेश**</u>

प्रस्तुत अर्ज वादी क्र.४ ने मयत वादी क्र.१ चंपाबाई शंकर कांबळे हिचे विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी क्र.४ चे कथन की, वादी क्र.१ चंपाबाई शंकर कांबळे ही दि.०२/०२/२०२५ रोजी मयत झाली आहे. परंतु, वादी क्र.१ चे नातूकडून वादी क्र.१ मयत झाल्याबाबत उशीरा माहिती मिळाली. त्यामुळे वादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी एकूण १ महिना ५ दिवस विलंब झालेला आहे. त्यामुळे दावा अबेट झाला आहे. सबब, वादी क्र.१ बाबत झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करणेची विनंती वादीने केली आहे.

३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे देवून असे कथन केले की, वादी क्र.१ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेणे गरजेचे होते. तसेच, विलंब माफीचा व वारस रेकॉर्डचा अर्ज सोबत दाखल केलेला नसल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा चालू असताना वादी क्र.१ चंपाबाई शंकर कांबळे ही दि.०२/०२/२०२५ रोजी मयत झाली आहे. परंतु वादी क्र.१ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्याने दावा अबेट झाला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दावा हा प्रातिनिधीक स्वरुपात हक्कज्ञापन व कायम मनाईकरिता दाखल केलेला असल्याने व वादी क्र.१ ही आवश्यक पक्षकार असल्याने वादी क्र.१ हिच्या वारसांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. शिवाय, वादी क्र.४ यांनी अबेटमेंट रद्द करणेकरिता दिलेले कारण संयुक्तीक आहे. वादीने त्यांचे कथनाचे

पुष्टयर्थ शपथपत्र दाखल केले आहे. सदर वादी क्र.१ च्या मृत्यूनंतर त्यांचे वारसांच्या रुपात त्यांचा दावा मिळकतीमध्ये असणारा हक्क व अधिकार जीवंत राहणार आहे. अशा परिस्थितीत दाव्याचा संपूर्णपणे व कायमस्वरुपी न्यायनिर्णय होणेकामी मयत वादी क्र.१ विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांचेतील मुळ वाद संपुष्टात येणार नाही व नवीन दावे दाखल होण्याची शक्यता निर्माण होणार आहे.

५. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादी विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करत आहे -

**आदेश**

१. अर्ज (नि.४१) मंजुर करण्यात येतो.

२. वादी क्र.१ विरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करणेत येत आहे.

PRASHANTKUMAR ASHOK PATIL

Digitally signed by PRASHANTKUMAR ASHOK PATIL
Date: 2025.08.13 15:59:36 +0530

**(पी.ए.पाटील)**
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
जयसिंगपूर.

दिनांक १३/०८/२०२५